शासकीय वापराकरिता इलेक्ट्रीक वाहनांचीच खरेदी बंधनकारक

मुंबई-पुण्यासह सहा शहरांमध्ये धोरण लागू, ९३० कोटींची तरतूद

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : बृहन्मुबई, पुणे, नागपूरसह सहा प्रमुख शहरांमध्ये १ एप्रिल २०२२ पासून शासकीय, निम शासकीय, महापालिका किंवा सरकारच्या निधीतून खरेदी करण्यात येणारी व भाडेतत्वावरील वाहने बॅटरीवरील इलेक्ट्रीक वाहने (इव्ही) असावी, असे बंधन सुधारित 'महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरणा'त घालण्यात आले आहे. तर खासगी इलेक्ट्रीक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी निर्मिती, वाहन-बॅटरी खरेदी-विक्री, नोंदणी, मोडीत काढणे अशा विविध टप्प्यांवर सवलती देण्यात येणार आहेत. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पुढील चार वर्षांकरिता ९३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद आणि नाशिक या सहा शहरांमध्ये प्रामुख्याने हे धोरण लागू राहील. २०२५ पर्यंत या शहरांमधील नवीन वाहन नोंदणीत १० टक्के हिस्सा बॅटरी इलेक्ट्रीक वाहनांचा असणे, २५ टक्के सार्वजनिक वाहतूक वाहनेही या प्रकारची असणे, 'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळा'च्या ताफ्यातील किमान १५ टक्के वाहने ईव्ही प्रकाराची असणे, या धोरणानुसार बंधनकारक असेल. इलेक्ट्रीक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशनची कमतरता हा अडचणीचा मुद्दा ठरतो. म्हणून या वाहनांच्या चार्जिंगसाठी बृहन्मुंबई (१५००), पुणे (५००), नागपूर (१५०), नाशिक (१००), औरंगाबाद (७५), अमरावती (३०), सोलापूर (२०) येथे येत्या चार वर्षांत स्टेशन उभारण्याचे उद्दिष्ट आहे.

सध्या महाराष्ट्रात नोंदणी असलेल्या तीन कोटी वाहनांपैकी केवळ ३८ हजार वाहने इलेक्ट्रीक आहेत. भविष्यात इलेक्ट्रीक वाहनांची खरेदी व वापर वाढवून पर्यावरण संतुलन राखण्यासाठी २०१८च्या सुधारित महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरणाला पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने शुक्रवारी मान्यता दिली. हे धोरण राज्यात विक्री व नोंदणी झालेल्या फक्त बॅटरीद्वारे चालणाऱ्या इलेक्ट्रीक वाहनांना लागू असेल. यात माईल्ड-स्ट्रॉंग हायब्रीड, प्लग-इन हायब्रीड इलेक्ट्रीक वाहने समाविष्ट नसतील. धोरणाच्या अंमलबजावणीसाठीचा निधी येत्या काळात जुन्या वाहनांच्या नोंदणीसाठी आकारण्यात येणारा हरित कर, जीवाश्ट इंधनावरील उपकर आदीच्या माध्यमातून उपलब्ध केला जाईल. वाहनांची मागणी, नोंदणीतून परिवहन विभाग, पायाभूत चार्जिंग व्यवस्था निर्मितीसाठी उर्जा विभाग, वाहन उत्पादनासाठी उद्योग विभाग वित्तीय प्रोत्साहनाचा भार उचलणार आहे.

विज्ञान शाखेसाठी जागरूकता महत्त्वाची!

करियर समुपदेशक विवेक वेलणकर यांचे मार्गदर्शन

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : विज्ञान शाखा आणि आनुषंगिक क्षेत्रात करिअर करायचे असल्यास दहावीनंतर जागरूकपणे विषयांची निवड करणे आणि प्रवेश परीक्षांची तयारी या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. वैद्यकीय, अभियांत्रिकी या क्षेत्रांत करिअरच्या संधी आहेतच, मात्र त्याचबरोबर इतरही क्षेत्रांमध्ये चांगले पर्याय उपलब्ध असतात. त्याची नीट माहिती घेऊन, आपली आवड आणि क्षमता लक्षात घेऊन करिअरची निवड करणे आवश्यक आहे. कोणत्या महाविद्यालयात प्रवेश मिळतो त्यावर काहीही अवलंबून नसते. मात्र दहावीनंतर मिळेल तेथे प्रवेश घेऊन पुढील अभ्यासावर काटेकोरपणे लक्ष देणे गरजेचे आहे, असा सल्ला करिअर समुपदेशक विवेक वेलणकर यांनी शुक्रवारी विद्यार्थ्यांना दिला.

लोकसत्तातर्फे आयोजित 'मार्ग यशाचा' या दूरचित्रसंवादात वेलणकर यांनी विज्ञान शाखेतील करिअर संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आयटीएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स या कार्यक्रमाचे सहप्रायोजक होते.

कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे त्यानुसार विज्ञान शाखेतील अभ्यासक्रम निवडणे आवश्यक असते. बऱ्याच पदवी अभ्यासक्रमांमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, जीवशास्त्र हे विषय बारावीच्या स्तरावर महत्त्वाचे असतात. मात्र माहिती तंत्रज्ञान, व्यावसायिक अभ्यासक्रमातील विषय घेतल्यासही फायदा होऊ शकतो. वैद्यकीय क्षेत्रातील बहुतांश अभ्यासक्रमांचे प्रवेश राष्ट्रीय वैद्यकीय प्रवेश परीक्षेवर (नीट) अवलंबून असतात. त्यासाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र हेच विषय महत्त्वाचे असतात. त्यामुळे अनेक विद्यार्थी बारावी स्तरावर गणित विषय घेत नाहीत; मात्र गणित घेतल्यास भौतिकशास्त्राचा पाया पक्का होण्यासही मदत होते, असेही वेलणकर यांनी सांगितले.



अभियांत्रिकी पदविकेचा मार्ग

अनेक विद्यार्थी पदवीच्या प्रवेश परीक्षेतील स्पर्धा टाळण्यासाठी दहावीनंतर पदविका अभ्यासक्रमाला व त्यानंतर पदवीच्या दुसऱ्या वर्षाला थेट प्रवेश घेतात; मात्र यामुळे स्पर्धा टळत नाही. शिवाय पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेताना जेवढ्या जागा उपलब्ध असतात त्यापैकी केवळ १० टक्के जागा थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश घेताना असतात. ज्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले आहे त्यांना दहावीनंतर इंग्रजी माध्यमाकडे वळायला ६ ते ७ महिने लागतात. अकरावी-बारावीमध्ये एवढा वेळ मिळत नाही. याउलट, पदविका अभ्यासक्रम तीन वर्षांचा असल्याने पुरेसा वेळ मिळतो. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी दहावीनंतर पदविका अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायला हरकत नाही, असा सल्ला त्यांनी दिला.

परदेशी शिक्षणाचा विचार पदवीनंतरच...

परदेशी शिक्षणासाठी जायचे असल्यास पदवीनंतर जी प्रगल्भता मुलांमध्ये असते तेवढी बारावीनंतर विकसित झालेली नसते. शिवाय पदवीनंतर परदेशी शिक्षणासाठी जाण्यासाठी शिष्यवृत्ती अधिक उपलब्ध आहेत. त्यासाठी द्याव्या लागणाऱ्या जीआरई, टोफेल या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठीही पदवीपर्यंत वेळ मिळतो. शिवाय परदेशी जाऊन शिक्षण घेतल्यानंतर तेथेच नोकरी करून अधिक उत्पन्न कमवण्याचा हेतू असेल तरच जावे. अन्यथा परदेशात केवळ शिक्षण घेऊन भारतात आल्यास अपेक्षित उत्पन्नाची नोकरी मिळेलच असे नाही. त्यामुळे आपण परदेशी का जात आहोत, हे मुलांना माहीत असायला हवे.

संधी कुठे?

औषधनिर्माणशास्त्र क्षेत्राचा आलेख मात्र कायम चढाच राहातो. यासाठी रसायनशास्त्राचे ज्ञान आवश्यक आहे. एमबीबीएससाठी रशिया, चीन, फिलिपिन्स येथे जाता येते; मात्र तेथून परतल्यानंतर भारतात काम करण्यासाठी एक परीक्षा द्यावी लागते. त्यानंतर प्रशिक्षणार्थी म्हणून काम करावे लागते. यात साधारण आठ वर्षे जातात. करोनाच्या काळात होमिओपॅथी व आयुर्वेदाला महत्त्व प्राप्त झाले. या दोन्ही अभ्यासक्रमांचा खर्च कमी असून नीटमध्ये कमी गुण मिळवणाऱ्यांनाही येथे प्रवेश मिळतो. पशुवैद्यकशास्त्र क्षेत्रातही अनेक संधी उपलब्ध आहेत. बँका आणि विमा कंपन्या जेव्हा कुक्कुटपालन किंवा दुग्धव्यवसायाला कर्ज किंवा विमा देतात तेव्हा प्राण्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी पशुवैद्यकांची गरज भासते. अभियांत्रिकीसाठी गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र हे विषय महत्त्वाचे आहेत. तसेच जेईई मेन्स आणि महाराष्ट्र सीईटी या परीक्षा द्याव्यात. बीट्स व व्हीआयटीसारख्या संस्थांच्या स्वतंत्र प्रवेश परीक्षा असतात. वास्तुस्थापत्यशास्त्र अभ्यासक्रमाचे प्रवेश नाटा परीक्षा आणि बारावीचे गुण याआधारे होतात.

रविवार, २५ जुलै २०२१
लोकरंग
उद्रेकातून उरले काही...
अभिजीत ताम्हणे


परिवर्तन
३० वर्षांपूर्वीचे आणि नंतरचे!
निरंजन राजाध्यक्ष
२४ जुलै १९९१ रोजी भारताने आर्थिक उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणासाठी आपले दरवाजे खुले केले. अर्थव्यवस्थेत आमूलाग्र क्रांती घडली. आज ३० वर्षांनंतर त्यातून काय फलित निष्पन्न झाले? आणि येत्या ३० वर्षांत प्रगतीचा हाच वेग कायम राहिला (किंवा न राहिला) तर काय होऊ शकेल याचा धांडोळा घेणारा खास लेख...
भांडवली बाजारातील तेजीमागील अदृश्य हात
आनंद मोरे

वसंतबहार
डॉ. माधवी वैद्य

स्टॅन स्वामींच्या कार्याबद्दलचे वक्तव्य न्यायालयाकडून मागे

मुंबई : वैद्यकीय जामिनाच्या प्रतीक्षेत असताना निधन झालेले एल्गार परिषद प्रकरणातील आरोपी स्टॅन स्वामी यांनी समाजासाठी केलेल्या कार्याबाबत आदर व्यक्त करणारे वक्तव्य मागे घेत असल्याचे उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट केले. राष्ट्रीय तपास यंत्रणेने या वक्तव्याबाबत आक्षेप घेतल्यानंतर न्यायालयाने हे वक्तव्य मागे घेत असल्याचे स्पष्टीकरण दिले.

स्टॅन स्वामी यांनी वैद्यकीय कारणास्तव जामिनाची मागणी केली होती. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी न्या. एस. एस. शिंदे व न्या. एन. जे. जमादार यांच्या खंडपीठाने स्वामी यांनी त्यांच्या हयातीत समाजासाठी जे कार्य केले त्याचा आम्हाला आदर आहे, असे म्हटले होते. स्वामी यांच्या मृत्यूची महानगरदंडाधिकाऱ्यांकडून चौकशी अद्याप सुरू झालेली नाही, असे राज्य सरकारने सांगितले.

पश्चिम रेल्वे
ई-प्रापण निविदा सूचना क्र. एस/२८/२०२१ दिनांक : २१.०७.२०२१

अ.क्र.	संक्षिप्त वर्णन	परिमाण	टी.ओ.डी.
७७१	वूड बेस्ड रेसीन	१००० नग	०९.०८.२०२१
७७२	गियर केस कम्प्लीट	४ नग	०९.०८.२०२१
७७३	४१ मिमी व्यासाच्या पिनसाठी वॉशर	१०००० नग	०९.०८.२०२१
७७४	गंगवे ब्रिज माऊंटिंग असेंब्ली	६४० नग	०९.०८.२०२१
७७५	डब्ल्यूएपी४साठी कनेक्शन स्ट्रॅप असेंब्लीचा संच	३०६ संच	०९.०८.२०२१
७७६	रोलर बेअरिंग	३१४ नग	१०.०८.२०२१
७७७	फिल्टर असेंब्ली	१८ नग	११.०८.२०२१
७७८	प्लग असेंब्ली	१३१५ संच	११.०८.२०२१
७७९	ट्रॅक फीड बॅटरी चार्जर	८१९ नग	१२.०८.२०२१
७८०	टार प्लास्टिक कंपाऊंड	६७३४ किग्रॅ	१३.०८.२०२१
७८१	व्हीआरएलए व्हॉल्व रेग्युलेटेड (सिल्ड) लीड असेंब्ली बॅटरी २ व्ही३०० एएच	३०२८ नग	१३.०८.२०२१
७८२	३५ मिमी एनएबीओ ब्रेक पॅड्सचा संच	२००० नग	१३.०८.२०२१
७८३	एलएमएलए, लो मेंटेनन्स लीड ॲसिड सेकंडरी सेल्स, २व्ही, ३०० एएच	३०२८ नग	१६.०८.२०२१
७८४	स्विचेस ६ ए २५० व्ही	१६ संच	१६.०८.२०२१
७८५	आर/एम पेंट जेनेटियन ब्ल्यू	३८६२० लिटर	१८.०८.२०२१
७८६	सिंगल बॉटल व्हॅक्यूम सर्किट ब्रेकर	१५० नग	१८.०८.२०२१
७८७	४८ व्ही-२०० एएचच्या व्हीआरएलए बॅटरीज	११० संच	१९.०८.२०२१
७८८	टॅप चेंजरसाठी एओएच कीट	९८ संच	१९.०८.२०२१
७८९	गियर ऑइल ऑप्टिगियर आरएमओ	५०६३ लिटर	१९.०८.२०२१
७९०	एलएमएलए सेकंडरी सेल्स २ व्ही/२०० एएच	१६४७ नग	२५.०८.२०२१
७९१	मेन एलईडी सिग्नल, लायटिंग युनिट लाल, पिवळा, हिरवा	५३२३ नग	२६.०८.२०२१
७९२	सिग्नलिंग कारणासाठी वायर ७ स्ट्रँड स्टील गॅल्वनाइज्ड	४५९४ किग्रॅ	३०.०८.२०२१

इरठे, खरेदीची बंधने आणि तपशीलवार निविदा अटींसाठी कृपया www.ireps.gov.in आणि www.wr.indianrailways.gov.in ला भेट द्या.
0285
प्रमुख मुख्य साहित्य व्यवस्थापक
आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
चर्चगेट-विरार सेक्शनमधील विविध कामे
डीईएन (साऊथ) बीसीटी, पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, इंजिनीअरिंग डिपार्टमेंट, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८ हे येथे खाली दिलेल्या तपशिलानुसार ई-निविदा मागवीत आहेत. **(१) निविदा सूचना क्रमांक आणि तारीख :** बीसीटी/२१-२२/१६० दि. २२.०७.२०२१. **काम आणि त्याची जागा :** चर्चगेट-विरार सेक्शन :- एडीईएन (टी/एस) पीएल सेक्शन यांच्या अधिकार क्षेत्रातील ट्रॅकमधील घाण, कचरा, प्लॅस्टिक, प्लॅस्टिकच्या पिशव्या, कागद आणि इतर रद्दी साहित्य बाहेर काढून त्याची विल्हेवाट लावणे. तेथील दाट रानगवत, छोट्या आकाराची रानझाडे कापून काढणे. **कामाचा अंदाजे खर्च :** रु. १,६२,६२,३२८.८२. **(२) निविदा सूचना क्रमांक आणि तारीख :** सीसीजी-विरार सेक्शन : डीईएन (एस) बीसीटी सेक्शन यांच्याअंतर्गत रेल्वेच्या बीएफआरवरील क्रेनच्या साहाय्याने मोकळे केलेले रूळ, पीआरसी स्लीपर्स, टर्नआऊट स्लीपर्स, क्रॉसिंग, स्विचेस इत्यादी उचलणे. **कामाचा अंदाजे खर्च :** रु. ५४,८६,६४६.९४. **इ.र.ठेव :** प्रत्येक निविदेसाठी 'निरंक'. **सादर करण्याची तारीख आणि वेळ :** प्रत्येक निविदेसाठी २०.०८.२०२१ रोजी १५.३० वाजेपर्यंत, **उघडण्याची तारीख आणि वेळ :** प्रत्येक निविदेसाठी २०.०८.२०२१ रोजी १५.३० वाजता. **सूचना :** निविदेची कागदपत्रे डाऊनलोड करण्यासाठी तसेच शुद्धिपत्रे व अधिक माहितीसाठी आमची वेबसाइट www.ireps.gov.in येथे भेट द्यावी.
0284
आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly

मध्य रेल्वे
ऑटोमॅटिक टेलर मशिनची स्थापना करून ती चालविणे.
मुंबई डिव्हिजनमधील पुढील रेल्वे स्टेशनसवर पाच वर्षांच्या मुदतीसाठी ऑटोमॅटिक टेलर मशिनची स्थापना करून ती चालविण्यासाठी ई-निविदा मागविण्याची सूचना www.ireps.gov.in या वेबसाइटवर अपलोड केली आहे. स्टेशनसची नावे- अंबरनाथ, भांडूप, बदलापूर, छ. शिवाजी मुंबई टर्मिनस, (साइट-१), छ. शिवाजी टर्मिनस मुंबई (साइट-२), दादर, डोंबिवली, कुर्ला, कल्याण, मुलुंड (पूर्व), मुलुंड (पश्चिम), पनवेल, ठाणे, उल्हासनगर आणि विक्रोळी याकरिता निविदा कारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या निविदांचा तपशील जाणून घेण्यासाठी www.ireps.gov.in या वेबसाइटला भेट द्यावी.

निविदा क्रमांक	निविदा बंद होण्याची तारीख
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-एबीएच	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-बीएनडी	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-बीयूडी	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-सीएसएमटी-१	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-सीएसएमटी-२	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-डीआर	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-डीआय	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-सीएलए	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-केवायएन	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-एमएलएनडीई	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-एमएलएनडीडब्ल्यू	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-पीएनव्हीएल	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-टीएनए	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-यूएलएनआर	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता
बीबी-सी-३२५-पीओ-एटीएम-२१-व्हीके	१६.०८.२०२१ रोजी ११.०० वाजता

याशिवाय वरील निविदांच्या विषयी जरकाही जादा मजकूर शुद्धिपत्रे, मुदतीत वाढकरणे, स्पष्टीकरणे असल्यास ते फक्त वेबसाइटवर अपलोड करण्यात येईल. बोलीदारांना त्यांची माहिती अद्यावत ठेवण्यासाठी या वेबसाइटला नियमितपणे भेटी द्याव्यात. अटी असलेले दोन तारकाळ नाकारले जातील.
305
रेल्वे मदत हेल्पलाइन- १३९

मध्य रेल्वे
ऑगस्ट-२०२१ या महिन्यातील ई-लिलावाचा कार्यक्रम
भारताचे राष्ट्रपती यांच्या वतीने आणि त्यांच्याकरिता दि प्रिंसिपॉल चीफ मॅनेजर हे भंगाराच्या विक्रीकरिता ऑगस्ट-२०२१ या महिन्यात ई-लिलावाचा कार्यक्रम खालील प्रमाणे आयोजित करणार आहेत.

लिलाव आयोजक अधिकारी	लिलावाच्या तारखा आणि दिवस			संपर्क क्रमांक
सीनियर डीएमएम/ एनजीपी	०४.०८.२०२१ बुधवार	१३.०८.२०२१ शुक्रवार	२३.०८.२०२१ सोमवार	७२१९६१२७५०
सी. डीएमएम/बीएसएल सोबत एमएमआरडेपो	०५.०८.२०२१ गुरुवार	१६.०८.२०२१ सोमवार	२६.०८.२०२१ गुरुवार	७२१९६११७५१
सी. डीएमएम/पीए	०६.०८.२०२१ शुक्रवार	१७.०८.२०२१ मंगळवार	२७.०८.२०२१ शुक्रवार	७२१९६१३७५०
सी. डीएमएम/बीबी	०९.०८.२०२१ सोमवार	१८.०८.२०२१ बुधवार	३०.०८.२०२१ सोमवार	८८२८११९७५०
सी. डीएमएम/एसयूआर	१०.०८.२०२१ मंगळवार	१९.०८.२०२१ गुरुवार	३१.०८.२०२१ मंगळवार	७२१९६१४७५०
एसएमएम(जी) सीआरडी	०४.०८.२०२१ बुधवार	१३.०८.२०२१ शुक्रवार	२३.०८.२०२१ सोमवार	८८२८११०७६१
डेप्युटी सीएमएम(एम) पीआर	०६.०८.२०२१ शुक्रवार	१७.०८.२०२१ मंगळवार	२७.०८.२०२१ शुक्रवार	८८२८११९७५५
डेप्युटी सीएमएम/ (सीडब्ल्यूई)एमटीएन	०५.०८.२०२१ गुरुवार	१६.०८.२०२१ सोमवार	२६.०८.२०२१ गुरुवार	८८२८११९७७०
डेप्युटी सीएमएम(एस) एचक्यू एचबीएचआरसाठी	०४.०८.२०२१ बुधवार	१३.०८.२०२१ शुक्रवार	२३.०८.२०२१ सोमवार	८८२८११०७६१
डेप्युटी सीएमएम(एसीएल) बीएसएल	०९.०८.२०२१ सोमवार	१८.०८.२०२१ बुधवार	३०.०८.२०२१ सोमवार	७२१९६११७५०

सूचना : आवश्यकता असल्यास पात्र लॉटच्या लिलावाची मूळ लिलावाच्या तारखेनंतरच्या कामाच्या दिवशी आणि त्याच दिवशी या वेळी पूरक लिलाव आयोजित करण्यात येईल. रेल्वे प्रशासनाने कोणताही परक लिलाव स्वतःच्या निर्णयानुसार रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.
302
रेल्वे मदत हेल्पलाइन नं. १३९

पश्चिम रेल्वेने वांद्रे टर्मिनस ⇌ जबलपूर दरम्यान सुपरफास्ट उत्सव विशेष ट्रेनच्या सेवांमध्ये वाढ केली आहे

ट्रेन नं.	मूळ व गंतव्य स्थानक	सेवेचा दिवस	विस्ताराचा तपशील
०२१३३	वांद्रे टर्मिनस - जबलपूर (साप्ताहिक)	शनिवार	०१ जानेवारी, २०२२ पर्यंत
०२१३४	जबलपूर - वांद्रे टर्मिनस (साप्ताहिक)	शुक्रवार	३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत

वरील ट्रेन्सच्या थांब्यासंबंधित सविस्तर वेळांकरिता कृपया www.enquiry.indianrail.gov.in या वेबसाइटला भेट द्यावी.

* निश्चित तिकिटे असलेल्या प्रवाशांनाच केवळ या विशेष गाड्यांमध्ये प्रवेश करण्यास अनुमती देण्यात येईल.
* प्रवाशांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी कृपया गाडीत प्रवेश करतेवेळी, प्रवास करतेवेळी व गंतव्य स्थानी पोहोचल्यावर कोव्हिड-१९ संबंधित सर्व निकष, एसओपी'जचे अनुपालन करावे.

ट्रेन नं. ०२१३३ च्या विस्तारित फेऱ्यांची बुकिंग नामनिर्देशित पीआरएस काऊंटर्स व आयआरसीटीसी वेबसाइटवर २६ जुलै, २०२१ रोजी सुरू होईल. वरील ट्रेन विशेष शुल्कावर पूर्णतः आरक्षित विशेष ट्रेन म्हणून धावेल.

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाइक करा facebook.com/WesternRly
आम्हाला फॉलो करा twitter.com/WesternRly

कृपया सर्व आरक्षित तिकिटांकरिता ओळखपत्र पुरावा सोबत ठेवावा.

पश्चिम रेल्वे ०७ ऑगस्ट, २०२१ च्या प्रभावापासून मुंबई सेन्ट्रल ⇌ अहमदाबाद दरम्यान तेजस एक्स्प्रेस पूर्ववत सुरू करणार आहे

ट्रेन नं.	मूळ व गन्तव्य स्थानक	सेवेचे दिवस	प्रस्थान	आगमन
८२९०१	मुंबई सेन्ट्रल - अहमदाबाद	शुक्रवार, शनिवार, रविवार व सोमवार	१५.४५ वा.	२२.०५ वा. (त्याच दिवशी)
८२९०२	अहमदाबाद - मुंबई सेन्ट्रल	शुक्रवार, शनिवार, रविवार व सोमवार	०६.४० वा.	१३.०५ वा. (त्याच दिवशी)

थांबा स्थानके : अंधेरी, बोरिवली, वापी, सुरत, भरूच, वडोदरा व नाडियाड स्थानके दोन्ही दिशांतील. अंधेरी स्थानकाकडील थांबा ३१ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत तात्पुरत्या तत्त्वावर आहे.

रचना : एसी चेअर कार व एसी एक्झिक्युटिव्ह चेअर कार कोचेस.

थांब्यांच्या वेळांसंबंधित सविस्तर माहिती आणि रचना याकरिता प्रवाशांनी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या वेबसाइटला भेट द्यावी.

वरील ट्रेन पूर्णतः आरक्षित ट्रेन म्हणून धावेल आणि या ट्रेनची बुकिंग केवळ आयआरसीटीसी वेबसाइटवर सुरू होईल. याअतिरिक्त, शेवटच्या मिनिटात प्रवास नियोजनाबाबत प्रवासी सुविधेकरिता अहमदाबाद, सुरत व मुंबई सेन्ट्रल रेल्वे स्थानकांकडेसुद्धा आयआरसीटीसीद्वारा करन्ट रिझर्व्हेशन काऊन्टर्स/ किओस्क्स उभारण्यात येणार आहेत.

- निश्चित तिकिटे असलेल्या प्रवाशांनाच केवळ या विशेष गाड्यांमध्ये प्रवेश करण्यास अनुमती देण्यात येईल.
- प्रवाशांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी कृपया गाडीत प्रवेश करतेवेळी, प्रवास करतेवेळी व गन्तव्य स्थानी पोहोचल्यावर कोव्हिड-१९ संबंधित सर्व निकष, एसओपी'जचे अनुपालन करावे.

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly
आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

कृपया सर्व आरक्षित तिकिटांकरिता ओळखपत्र पुरावा सोबत ठेवावा.

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल आयडी: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: https://www.mcxccl.com

३० जून २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिक अलेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३० जून २०२१ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ मार्च २०२१ लेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० जून २०२० अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२१ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	१,९२७.९५	२,०७५.२९	१,७३८.१३	८,६९७.४३
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक व / किंवा असाधारण बाबींपूर्वी)	६९१.५४	८५६.१९	६२६.५०	३,७२७.३१
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व / किंवा असाधारण बाबींनंतर)	६९१.५४	८५६.१९	६२६.५०	३,७२७.३१
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व / किंवा असाधारण बाबींनंतर)	६९१.५४	८५८.८४	६२६.५०	३,७२९.९६
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर)आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	६४५.२९	८६७.५२	६२०.१४	३,७३३.०९
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	(१६,२५७.६१)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)* मूलभूत (₹)	०.२९	०.३६	०.२६	१.५५
सौमिकृत (₹)	०.२९	०.३६	०.२६	१.५५

* अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.

सूचना:
१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.
२. दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून केले गेले आहे आणि संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ: मुंबई | दिनांक: २३ जुलै, २०२१